**रे. दि. मु. नं. २३९/२०१५ मधील नि.क्र. २५ चे अर्जावरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात आवश्यक दुरूस्ती करण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींतर्फे त्यांचे म्हणणे निशाणी क्र. २८ वर दाखल करण्यात आले आहे.

२) प्रस्तुत अर्जात वादींनी असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाईकरीता मूळ प्रकरण दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये गट नं. १४६ मधील वादी यांची पूर्वाधिकारी जकाप्पा गुरूनिंगा उमराणी यांनी दि. ०७.०५.१९८३ रोजीचे नोंद खरेदी दस्ताने खरेदी केलेल्या उत्तर बाजूच्या ०.९१ आर पोट खराब ०.०२ आर ची मिळकत व सदर गट नं. १४६ मधील १ विहीर व त्यातील आठ आणेचे हक्कासह व धावपाट पलान व विहिरीवर जाणे येणेचे रस्त्याचे समाईक वहिवाटीची हक्कासह तसेच गट नं. १४६ मधील विहीर व रस्ता यासाठी ०.०५ आर ची जमिनीचे समाईकातील क्षेत्राबाबतच्या मिळकतीबाबत वादी यांची निरंतर मनाईची मागणी आहे. वादींनी दावा दाखल करतेवेळी दावा परिच्छेद १ मध्ये दावा मिळकत म्हणून वर्णन ही दिलेले आहे. तथापि दावा मिळकतीचे वर्णन नमूद करताना पूर्वीचे वकिलांनी वादी यांच्या कागदपत्राप्रमाणे व दावा मिळकतीमधील प्रत्यक्ष वस्तुस्थिती नुसार पूर्ण वर्णन दिलेले नाही. त्यामुळे दाव्यामध्ये दावा मिळकत म्हणून आलेले वर्णन हे तांत्रिक कारणावरून अपुरे आहे. सदरची वस्तुस्थिती वादीस दाव्या संदर्भात पुरावा सादर करतेवेळी दावा मिळकतीचा स्पष्ट बोध होत नसल्याची बाब वादीस नवीन वकिलांची नेमणूक करून पुराव्याचे ॲफिडेव्हीट तयार करतेवेळी वादीचे निदर्शनास आली आहे.

३) वादींचे पुढील कथन असे की, वादी क्र. १ ही अल्पशिक्षित महिला असून सदरची बाब वादींना यापूर्वी निदर्शनास आली नाही. त्यामुळे दाव्यामध्ये तातडीने दुरूस्ती करणे अशक्य होत आहे. वादींनी दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेस मदत होण्याच्या दृष्टीने दावा मिळकतीचे वर्णन सविस्तर रेकॉर्डवर यावे यासाठी पुढील मजकुराची दुरूस्ती वादींना करावयाची आहे. दावा मिळकत परिच्छेद १ मधील दावा मिळकतीचे वर्णनात चतुःसीमेनंतर येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन यानंतर ''गट नं. १४६ मधील चालू पाण्याची विहीर व त्यातील आठ आणेच्या हक्कासह व धावपाट पलान व विहिरीवर जाणे येणेची

समाईक वहिवाटीचे हक्कासह व सदरील विहीर व रस्ता यासाठी समाईकात ठेवलेले ०.०५ आर ची जमीन मिळकत'' हा मजकूर नव्याने मूळ दाव्यात समाविष्ट होणेसाठी वादी यांची विनंती आहे. सदर मजकुरामुळे मूळ दाव्याचे स्वरुपात अगर मागणीमध्ये कोणताही बदल होत नाही. उलट सदर दुरूस्तीमुळे वाद मिळकतीचे स्पष्ट वर्णन रेकॉर्डवर येणार आहे. त्यामुळे मूळ दाव्याची सुनावणी करतेवेळी मे. कोर्टास मदत होणार आहे. त्यामुळे वादींना वर नमूद मजकुराचे मूळ दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमध्ये प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

४) प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जास अर्जाचे मंजुरीस विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी तर्फे प्रतीकथन असे की, वादींचा अर्ज, त्यातील कथन व सोबतचे ॲफिडेव्हीट मधील मजकूर गैरलागू असून बेकायदेशीर आहे. सत्यते अभावी व प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादी यांनी आणलेला दावा हा दि. ०७.०५.१९८३ चे खरेदी दस्ता वरून आणलेला आहे. दावा दाखल करतेवेळी वादीकडे खरेदी दस्त उपलब्ध होते. हे त्यांचेच कथनावरून स्पष्ट होते. म्हणजे दावा तयार करणेपूर्वी वादीकडे सर्व कागदपत्रे उपलब्ध होते. त्यामुळे दावा दाखल झालेनंतर नवीन कोणतेही फेरबदल दावा मिळकती मध्ये झालेले नाहीत. त्यामुळे दावेचे कामी कोणताही Subsequent event घडलेला नसलेने वादींचा अर्जच चालणेस पात्र नाही. वास्तविक वादींना सदर दुरूस्ती करणेस कोणते कारण घडून आले व ते केव्हा घडले याचा काही एक उल्लेख वादी यांनी अर्जाचे कामी नमूद केलेला नाही. सबब वादीचा अर्ज हा विनाकारण असलेने तो चालणेस पात्र नाही. वादींचा दावा दि. २५.११.२०१५ रोजी दाखल झालेला आहे व दावा दुरूस्ती अर्ज दि. १०.०४.२०१९ रोजी दावा चौकशीवर आलेनंतर दाखल झालेला आहे. म्हणजे जवळ जवळ ४ वर्षे ५ महिन्याच्या प्रदीर्घ कालावधीनंतर प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. शिवाय अर्ज दाखल करणेस वादींना एवढा अक्षम्य विलंब का झाला याबाबतही वादींनी अर्जाचे कामी कोणताही खुलासा दिलेला नाही. सबब वादींचा अर्ज मुदतीत नसलेने याही कारणास्तव वादींचा अर्ज चालणेस पात्र नाही. सबब याही कारणास्तव वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

६) उभय पक्षकारांतर्फे करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने, अभिलेखावर या टप्प्यापर्यंत दाखल असलेली कागदपत्रे व सादर केलेला युक्तिवाद यांचे पार्श्वभूमीवर प्रस्तुत अर्जाचे निर्णयाचे अनुषंगाने विचार केला असता खालील प्रश्नबिंदू माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष त्यांच्या अनुषंगाने असणाऱ्या सविस्तर कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींनी विनंती केल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये दुरूस्त्या करणेस परवानगी मिळणेसाठी वादी पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## * कारणमिंमासा *

७) सर्व प्रथम वादींनी विनंती केल्याप्रमाणे दाव्यामधील वाद कथनांमध्ये दुरूस्त्या करण्याची परवानगी देण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतुदीप्रमाणे वादींनी मागितलेल्या दुरूस्त्या या उभय पक्षकारांमधील मुलभूत वादविषयाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी मंजूर करणे जरुरीचे आहे किंवा कसे व मागितलेल्या दुरूस्त्या मंजूर करणेस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील परंतुकामध्ये नमूद केलेल्या अटींची बाधा येते किंवा कसे हे पाहणे जरुरीचे आहे. सदरच्या कायदेशीर तरतुदीचा विचार करून प्रस्तुत अर्जाचा निर्णय करणेकामी परस्परविरोधी कथनांची तपासणी करणे जरुरीचे आहे.

८) त्याबाबत उभय पक्षकारांतर्फे विद्वान विधिज्ञांनी अर्जातील व म्हणण्यातील कथनांशी संबंधित मिळताजुळता युक्तिवाद सादर केला आहे.

९) वर नमूद केल्याप्रमाणे परस्परविरोधी कथनांचा विचार केला असता सर्व प्रथम ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, वादींनी प्रस्तुत प्रतिवादींविरुद्ध प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जेवहिवाटीत प्रतिवादींनी हरकत अडथळा करून नये या करिता निरंतर ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. त्याचबरोबर वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रस्तुतचे प्रकरण दाव्याचे कामी मुद्दे काढणेसाठी निश्चित केले असता मुद्दे

काढण्यापूर्वीच दाखल केला आहे. यावरून वादींनी प्रस्तुतचा अर्ज दावा परिणामकारकरीत्या सुनावणीस लागण्यापूर्वी दाखल केला आहे ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाच्या तरतुदीची बाधा येत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे वादींनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज उभय पक्षकारांमधील मुलभूत वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी मंजूर करणे जरुरीचे आहे किंवा कसे या अनुषंगाने विचार करणे जरुरीचे आहे.

१०) वादींनी मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्त्यांचा विचार केला असता त्या दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये प्रस्तुत अर्जाचे परिच्छेद क्र. १ मध्ये दावा दुरूस्तीमध्ये समाविष्ट व्हावयाचा नियोजित मजकूर म्हणून जो मजकूर वादी समाविष्ट करून घेऊ इच्छितात तो मजकूर दावा मिळकतीच्या अनुषंगाने असलेल्या चालू पाण्याच्या विहिरीतील हक्कबाबात व जाण्यायेण्याच्या रस्त्याच्या हक्काबाबत असल्याचे दिसून येते. त्यांचा विचार केला असता प्रस्तावित दुरूस्त्या या दावा मिळकतीतील हक्कांबाबतच असल्याने त्या उभय पक्षकारांमधील वाद विषयांशी संबंधित असल्याचे दिसून येते. तसेच सदरच्या दुरूस्त्या या उभय पक्षकारांमधील दावा मिळकतीबाबतच्या निरंतर मनाईच्या मुलभूत वादविषयांचे गुणदोषावर निराकारण करण्यासाठी देखील जरुरीच्या आहेत. प्रस्तावित दुरुस्त्यांमुळे दाव्याच्या मुलभूत स्वरूपात बदल देखील संभवत नाही. त्याचबरोबर वादींनी विनंती केल्याप्रमाणे दुरूस्त्या करण्याची परवानगी वादींना न दिल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत होवून प्रकरणांची अनेकता होण्याची दाट शक्यता आहे. तसेच मागितलेल्या दुरूस्त्या या उभय पक्षकारांमधील मुलभूत वादविषयाचे परिणामकारकरीत्या अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी देखील मंजूर होणे जरुरीचे आहे. त्यामुळे त्या मंजूर करणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. प्रस्तावित दुरूस्त्या मंजूर केल्यानंतर त्याच्या अनुषंगाने प्रतिवादींना करावी लागणारी प्रतिकथने जादा कैफियती मार्फत सादर करण्याची मुभा निश्चितपणे त्यांना मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या न्याय हक्कांचे कोणत्याही प्रकारे नुकसान संभवत नाही.

११) तथापि, त्याचवेळी वादींनी प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज दाव्याचे कामी विलंबाने दाखल करून प्रतिवादींना खर्चाचे पेचीत पाडल्याबद्दल वादींनी प्रतिवादींना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादींनी त्यांची कैफियत

दि. ०३.०८.२०१६ रोजी दाखल केल्यानंतर व दावा मुद्दे काढणेकामी दि. ३०.११.२०१६ रोजी नेमल्यानंतर वादींनी सुमारे दोन वर्षाच्या विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने वादींनी प्रस्तुत प्रतिवादींना खर्चाची रक्कम म्हणून रुपये ६००/– देण्याचे आदेशीत केल्यास या प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व बाबींचा विचार करून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज नि. क्र. २५ वादींनी प्रस्तुत प्रतिवादींना खर्चाची एकूण रक्कम रू. ६००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी वर नमूद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम प्रस्तुत प्रतिवादींना अदा केल्यानंतर वादींना प्रस्तुत अर्ज नि. क्र. २५ मधील परिच्छेद १) मधील दावा दुरूस्तीमध्ये समाविष्ट व्हावयाचा नियोजित मजकूर म्हणून नमूद केलेला मजकूर मूळ दाव्यामध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी सदर आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक त्या दुरूस्त्या दाव्यात ज्या त्या ठिकाणी वैधानिक कालावधीमध्ये करून घेण्याचे तसेच दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्याचे वादींना निर्देशित करण्यात येत आहे.

सही/–

स्थळ:– जत
दि. २२.१२.२०२१

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मुळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २२/१२/२०२१. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः | २९/१२/२०२१. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १०/०१/२०२२. |